# मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन(स्मार्ट) प्रकल्प, पुणे प्रकल्पांतर्गत रिक्त संवर्ग पदे सेवा निवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांमधून भरण्याकरिता नामिकासूची तयार करण्यासाठी वैयक्तिक माहितीसह अर्ज मागविण्यात येत आहेत.

जागतिक बँक अर्थ सहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर) इ. ठिकाणी मंजूर करण्यात आलेली रिक्त असलेली संवर्ग पदे आवश्यकतेनुसार सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांच्यामधून भरणेकरिता नामिकासूची तयार करणेसाठी सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार त्या पदाकरिता आवश्यक शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या पात्र सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार थेट मुलाखतीव्दारे सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांची निवड करून नामिकासूची तयार करण्यात येईल आणि या नामिकासूचीतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना आवश्यकतेनुसार रिक्त पदावर नियुक्ती देण्यात येईल.

प्रकल्पातील विविध स्तरावरील पदे, संख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव, कामाचे स्वरूप, अर्जाचा विहित नमुना व अर्ज करण्याची पध्दती इ. बाबतची सविस्तर माहिती https://www.smart-mh.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

इच्छुक सेवानिवृत्त अधिकाऱ्यांनी शैक्षणिक अर्हता, अनुभव इत्यादीबाबतच्या स्वस्वाक्षरीत प्रमाणपत्रांसह विहित नमुन्यातील आपला अर्ज दि.२९/०७/२०२२ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यत किंवा त्यापूर्वी खालील पत्त्यावर सादर करावेत. उमेदवारांनी **Hard Copy** मध्ये सादर केलेले अर्जच विचारात घेतले जातील. ई-मेल किंवा तत्सम व्दारे सादर केलेले **Soft Copy** मधील अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

## अर्ज सादर करण्याचा पत्ता

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प, प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा, सेनापती बापट रोड, पुणे ४११०१६.

स्वाक्षरीत/-
(धीरज कुमार)
प्रकल्प संचालक,
मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व
ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

# सेवानिवृत्त अधिकारी / कर्मचाऱ्यांकरिता सर्व साधारण सूचना

१. जागतिक बँक अर्थ सहाय्यित मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प अंतर्गत प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर) इ. ठिकाणी मंजूर करण्यात आलेली विविध संवर्गाची रिक्त राहणारी पदे भरण्याकरिता सेवा निवृत्त अधिकाऱ्यांची नामसूचिका (Panel) तयार करण्यात येत आहे.

२. सदर पदे भरण्याकरिता त्या संवर्गातील पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या व विहीत गुणवत्ता धारण करणाऱ्या शासकीय अधिकारी /कर्मचारी यांचेकडून खालील सर्वसाधारण अटी व शर्तीचे अधीन राहून अर्ज मागविण्यात येत आहेत.

i. पात्र अधिकारी / कर्मचारी यांचे नाम सुचिका (Panel) तयार करण्यात येईल व नाम सुचिकेची वैधता ३ वर्षाकरिता असेल. नाम सुचिकेतील अधिकारी / कर्मचाऱ्यांमधून आवश्यकतेनुसार प्रकल्पात नियुक्ती केली जाईल.

ii. प्रकल्पातील पदांवर अर्ज करणाऱ्या सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांविरुध्द कोणतीही विभागीय चौकशी प्रस्तावित / सुरु नसावी.

iii. प्रकल्पातील नियुक्ती प्रथम एक वर्षाकरिता व तदनंतर आवश्यकतेनुसार कमाल २ वर्षाकरिता अशी कमाल ३ वर्षाकरिता नियुक्ती असेल. असे असले तरी प्रस्तुत नियुक्त्या हया प्रकल्पासाठी मंजुर पदांवर केल्या जात असल्याने शासनाकडून नियमित अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यास त्यांच्या सेवा आपोआप संपुष्टात येतील.

iv. प्रकल्पामार्फत दिले जाणारे परिश्रमिक व भत्ते हे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१६/१२/२०१७ मधील तरतुदीनुसार असेल.

v. वयोमर्यादा-सेवा निवृत्त कर्मचारी नियुक्तीनंतर वयाच्या ६५ वर्षापर्यंत कार्यरत राहू शकतील. आवश्यकतेनुसार सदरची वयोमर्यादा ७०वर्षापर्यंत सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने वाढविण्यात येईल.

vi. नामिकासूचीकरिता अर्ज करणारा सेवानिवृत्त अधिकारी शारीरिक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टिने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

vii. नियुक्त अधिकारी / कर्मचारी यांना प्रकल्पात नियमित करण्याची कोणतेही अधिकार / हक्क नसेल.

viii. नियुक्ती अधिकारी / कर्मचारी यांच्या सेवा गैरर्वतन, कामकाजात चुकारपणा, आर्थिक व प्रशासकीय अनियमितता, हितसंबंध संघर्ष (Conflict of interest) इ. कारणास्तव समाप्त करण्याचे अधिकार प्रकल्पास राहतील.

ix. वरील अटी व शर्ती शिवाय सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१६/१२/२०१७ मधील तरतुदी लागू राहतील.

x. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने सेवानिवृत्त झालेले व दि. ३०/०९/२०२२ पर्यंत सेवानिवृत्त होणारे अधिकारीही अर्ज करु शकतात.

३. जाहिरातीमध्ये नमुद पदांची संख्या, शैक्षणिक अर्हता, अनुभव व कामाचे स्वरूप या बाबतचा तपशील https://www.smart-mh.org संकेतस्थळावर उपलब्ध आहे. प्रकल्पाच्या गरजेनुसार त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार प्रकल्पाने राखून ठेवले आहेत.

४. अर्जासोबत शैक्षणिक अर्हता,अनुभव व इतर अनुषंगिक कागदपत्रे /प्रमाणपत्रे स्वस्वाक्षरीत करून सादर करणे अनिवार्य आहे. तसे नसल्यास अर्ज विचारात घेतला जाणार नाही. तसेच अर्जावरील फोटोवर स्वाक्षरी करावी.

५. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी अर्जासोबत महालेखाकार यांचे सेवानिवृत्ती वेतन आदेश सादर करावेत.

६. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांनी विहित नमुन्यातील अर्ज https://www.smart-mh.org या संकेतस्थळावरून download करून परीपूर्ण अर्ज खालील पत्त्यावर दि.   /   /२०२२ रोजी सायकाळी ५.३० वाजेपर्यंत सादर करावेत. विहित वेळेनंतर प्राप्त होणारे अर्ज ग्राहय धरले जाणार नाहीत.

मा.बाळासाहेब ठाकरे कृषि व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प,
प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष
शेती महामंडळ भवन, २७०, भांबुर्डा,
सेनापती बापट रोड, पुणे ४११०१६

७. प्राप्त अर्जांची छाननी केल्यानंतर पात्र सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांना प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार मुलाखतीकरिता बोलविण्यात येईल.

८. जाहिरातीमध्ये नमूद पदांकरिताची निवड प्रक्रिया, अटी शर्ती इ. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दि.१७/१२/२०१६ मधील तरतुदीनुसार राहील.

९. मुलाखतीसाठी येणाऱ्या सेवानिवृत्त अधिकारी /कर्मचाऱ्यांना प्रवास खर्च अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा खर्च प्रकल्प अंमलबजावणी कक्षाद्वारे अदा करण्यात येणार नाही.

## PCMU, PIU, RIU, DIU मधील कृषि विभागातून भरण्यात येणारी संवर्ग पदांचा तपशील खालीलप्रमाणे

| अ.क्र. | पद | संख्या | ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अतिरिक्त प्रकल्प संचालक | १ | १ - प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, पुणे |
| २ | अधिक्षक कृषि अधिकारी | १९ | ५ - प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, पुणे<br>६ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषि, पुणे<br>८ - विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, नागपूर, अमरावती |
| ३ | कृषि उपसंचालक | ३५ | १ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषि, पुणे<br>३४ - जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, प्रकल्प संचालक,आत्मा कार्यालय (सर्व जिल्हे) |
| ४ | तंत्र अधिकारी | ५८ | ५ - प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, पुणे<br>५ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, कृषि, पुणे<br>८ - विभागीय प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, ठाणे, पुणे, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, लातूर, नागपूर, अमरावती<br>३४ - जिल्हा प्रकल्प अंमलबजावणी कक्ष - प्रकल्प संचालक,आत्मा कार्यालय (सर्व जिल्हे)<br>१ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, महिला आर्थिक विकास महामंडळ, मुंबई<br>१ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, मुंबई<br>१ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, महाराष्ट्र ग्राम सामाजिक परिवर्तन फांउडेशन, मुंबई<br>१ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, पुणे<br>१ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघ, नागपूर<br>१ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, पुणे महानगरपालिका, पुणे |
| ५ | कृषि अधिकारी | १ | १ - प्रकल्प अंमलबजावणी कक्ष, महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ |
| ६ | कृषि पर्यवेक्षक | ४१ | ४१ - स्मार्ट कॉटन, तालुका स्तर |
| ७ | सहाय्यक अधिक्षक | २ | २ - प्रकल्प समन्वय व व्यवस्थापन कक्ष, पुणे |
| | **एकुण** | **१५७** | |